




दैनिक

अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : ३४१
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, मंगळवार, दि.२२ जुलै २०२५


## दोन दुचाक्या आमोरासमोर धडकल्याने शालेय विद्यार्थी गंभीर जखमी

### वीज केंद्राच्या मनोरंजन गुहा समोरील घटना !



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२१, नागपूर :** खापरखेडा पोलीस ठाण्याच्या हाकेच्या अंतरावर असलेल्या वीज केंद्राच्या मनोरंजन गृहासमोर दोन दुचाक्या आमोरासमोर २१ जुलै सोमवारला सकाळच्या सुमारास धड़कल्या. सदर घटनेत दोन्ही दुचाकी चालक गंभीररित्या जखमी झाले आहेत.

प्राप्त माहिती नुसार शुभम गौतम(१७) चनकापूर व प्रेमनारायण जयदेव ढोके (३३) ताम सवाडी असे गंभीर जखमीचे नावे आहेत. शुभम हा महाराष्ट्र विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय खापरखेडा येथील १२ व्या वर्गाचा विज्ञान शाखेचा विद्यार्थी आहे तर प्रेमनारायण ढोके हा खापरखेडा वीज केन्द्रात ओरॉल मध्ये काम करणारा कामगार आहे.

घटनेच्या दिवशी सोमवारला प्रेमनारायण हा विज केन्द्राचा प्रवेश द्वारावर सुपरवायजरला पैसे मागण्यासाठी आला होता. यादरम्यान तो आपल्या नव्या कोऱ्या दुचाकीने खापरखेडाकडे जात होता तर महाराष्ट्र विद्यालय कनिष्ठ महाविद्यातील दोन विद्यार्थी खापरखेड्या वरून स्कुटी क्रमांक एमएच-४०-बीवाय-४३९६ ने महाविद्यालयात जात होते यावेळी अचानक दोन्ही दुचाक्या आमोरासमोर धडकल्याने यात दोन्ही दुचाकी चालक हे गंभीर जखमी झाले. गंभीर जखमींना जवळच्या चिचोली प्राथमिक आरोग्य केन्द्रात हलविले. दोन्ही जखमी गंभीर असल्याचे पाहून डॉक्टरांनी शासकीय मेयो रुग्णालयात हलविले. यातील जखमी शुभमचा खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहे. बातमी लिहीपर्यंत खापरखेडा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला नव्हता.

## राज्य उत्पादन शुल्क कार्यालयाद्वारे जप्त रिकाम्या बाटल्यांचा लिलाव...



**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२१, ठाणे :** निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क, भरारी पथक क्र.२ ठाणे या कार्यालयातील सन २०२४ ते २०२५ या कालावधीत दारुबंदी गुन्हा अन्वेषणा अंतर्गत गुन्हा रजि क्र. ११०/२४, ३६/२५, ६४/२५, १७८/२५ या वारस गुन्ह्यातील जप्त मुद्देमालाचे (रिकामी बाटल्या) जाहीर लिलाव मा.अधिक्षक राज्य उत्पादन शुल्क, ठाणे यांच्या उपस्थितीत दि.२ ऑगस्ट २०२५ रोजी ठीक १० वाजता निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, भरारी पथक क्र.२, ठाणे यांच्या कार्यालयात ठेवण्यात आलेला आहे.

सन २०२४ ते सन २०२५ या कालावधीत दारुबंदी गुन्हा अन्वेषण अंतर्गत गुन्हा रजि क्र. ११०/२४, ३६/२५, ६४/२५, १७८/२५ या वारस गुन्ह्यातील जप्त मुद्देमाल (रिकामी बाटल्या) कार्यालयीन वेळेत वरील लिलावाच्या ठिकाणी पाहणीसाठी ठेवण्यात येईल. सदर लिलाव संबंधित माहितीसाठी निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क भरारी पथक क्र. २ ठाणे या कार्यालयात संपर्क साधावा. तरी इच्छुकांनी लिलावात भाग घेण्याकरिता उपस्थित रहावे, असे आवाहन निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, भरारी पथक क्र.२, ठाणे यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

### डोंबिवलीतील स्टार कॉलनीत धक्का बसवणारी घटना

## गांजा विक्री करणाऱ्या टोळीचा दादावामन केदार यांच्यावर हल्ला



**अक्षराज : विनोद गिरी**

**दि.२०, डोंबिवली :** डोंबिवलीच्या स्टार कॉलनीमध्ये एक धक्कादायक घटना घडली. परिसरात गांजा विक्री करणाऱ्या टोळीने दादावामन केदार यांच्यावर धारदार शस्त्राने हल्ला केला. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

प्राथमिक माहितीनुसार, दादावामन केदार हे गेल्या त्यांच्या परिसरात सुरू असलेल्या गांजा विक्रीच्या विरोधात आवाज उठवत होते. त्यांनी पोलिसांकडे तक्रारी देखील दाखल करणार असल्याचे सांगितले असता नाराज झालेल्या टोळीतील काही सदस्यांनी त्यांच्यावर थेट हल्ला केला.

हल्ल्यात केदार यांच्या हातावर धारदार शस्त्राने वार करण्यात आले. स्थानिक नागरिकांनी तात्काळ हस्तक्षेप करून त्यांना जवळच्या रुग्णालयात दाखल केले असून, सध्या त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती डॉक्टरांनी दिली आहे.

## शिंदेंना सांभाळून घ्या! थेट दिल्लीहून मेसेज? भाजपला कोणती भीती?

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२१, नवी दिल्ली :** एकीकडे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि शिवसेना उबाठाचे प्रमुख उद्धव ठाकरेंच्या गाठीभेटी वाढत असताना दुसरीकडे शिंदेसेनेत अस्वस्थता पसरली आहे. शिंदेसेनेचे अने मंत्री, आमदार वादात अडकत चालले आहेत. त्यामुळे सत्तेत असलेल्या सेनेची गोची झाली आहे. विशेष म्हणजे अनेक प्रकरणांची चौकशी सुरु झालेली आहे. त्यातच गेल्या आठवड्यात पावसाळी अधिवेशन सोडून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे एकाएकी दिल्लीला निघून गेले. त्यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहांची भेट घेतल्याची माहिती समोर आली. त्यानंतर राज्य भाजपला मेसेज गेल्याची सुत्रांची माहिती आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत भाजप स्वबळ आजमावून २०२९ साठीची तयारी सुरु करेल, अशी चर्चा आहे. पण मुख्यमंत्र्यांनी मुंबई म हापालिका निवडणुकीबद्दल भूमिका स्पष्ट केली आहे. मुंबईत सोबत लढू. बाकीच्या ठिकाणी युती करायची ते नंतर बघू, अशी भूमिका मुख्यमंत्र्यांनी घेतली आहे. शिंदेसेनेला सांभाळून घेण्याच्या सूचना दिल्लीहून करण्यात आल्याची माहिती आहे.



त्यामुळेच मुंबई महापालिकेची निवडणूक शिंदेसेना आणि भाजप युतीत लढण्याच्या शक्यता वाढल्या आहेत.

मुंबई महापालिका निवडणुकीसाठी उद्धव ठाकरे आणि राज ठाकरेंची युती होण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत मराठी मतदार शिवसेना उबाठा आणि मनसेच्या पाठीशी उभे राहतील, याची भीती भाजपला वाटते. ठाकरे बंधूंच्या विरोधातील मतांची फाटाफूट भाजपला नको आहे. महायुती सोबत लढल्यास उद्धवसेना मुंबईत ४० ते ४५ जागा मिळू शकतात. पण भाजप, शिंदेसेना स्वतंत्र लढल्यास मतविभाजनामुळे उद्धवसेना ६० ते ६५ पर्यंत पोहोचू शकते. उद्धवसेनेनं उभारी घेतल्यास भाजपला फटका बसेल.

ते भाजपला नको आहे. लोकसभा, विधानसभेची निवडणूक भाजपनं शिंदेसेनेसोबत युती करुन लढवली. विधानसभेला चांगलं यश मिळाल्यानंतर एकनाथ शिंदे यांच्या जागी देवेंद्र फडणवीस यांच्याकडे राज्य सरकारचं नेतृत्व आलं. त्यामुळे शिंदे यांचं डिमोशन झाल्याचा मेसेज गेला. त्यातच आता शिवसेनेची स्थापना झालेल्या मुंबईत त्यांची साथ सोडल्यास भाजप मित्रपक्षांना वापरतो आणि गरज सरल्यावर दूर सारतो, असा संदेश जनतेत याचीही भीती भाजपला वाटते.

मुंबई महापालिकेत शिवसेनेसोबत युती केल्यास भाजप सर्वात मोठा पक्ष ठरण्याची शक्यता वाढेल, असंही दिल्लीतील धुरिणांना वाटतं. मुंबईत भाजप मजबूत आहे. त्या तुलनेत शिंदेसेना कम जोर आहे. त्यामुळे भाजप अधिकाधिक जागा लढवू शकतो. शिंदेसेनेपेक्षा दुप्पट जागा लढण्याचा भाजपचा मानस आहे. १२० ते १४० लढवून सर्वात मोठा पक्ष ठरण्याचा भाजपचा प्रयत्न असेल. एकनाथ शिंदेंनी गेल्या काही महिन्यांत उद्धवसेनेचे निम्म्याहून अधिक नगरसेवक गळाला लावले आहेत. त्यामुळे शिंदे अधिकाधिक जागांसाठी आग्रही आहेत.

तर दुसरीकडे एकनाथ शिंदे यांनी त्यांची मतपेढी वाढवण्यासाठी नवा प्लान ॲक्टिव्ह केला आहे. दलित मतदारांना जोडून घेण्यासाठी शिंदेसेनेनं गेल्याच आठवड्यात आनंदराज आंबेडकर यांच्या रिपब्लिकन सेनेशी युती केली. मुंबईत दलित मतदारांचं प्रमाण मोठं आहे. या मतदारांवर लक्ष केंद्रित करुन रिपब्लिकन सेनेसोबत युती करण्यात आलेली आहे. विशेष म्हणजे रामदास आठवलेंची रिपाईं महायुतीचा भाग असताना शिंदे यांनी रिपब्लिकन सेनेसोबत युती केलेली आहे. शिंदे यांनी बांधलेलं वेगळं संधान पाहता त्यांनी पुढे दगाफटका झाल्यास स्वबळाची तयारी सुरु केल्याचं दिसत आहे.

# मुंबई स्फोट प्रकरण : १८ वर्षांनी न्याय!

### मुंबई उच्च न्यायालयाने ७/११ स्फोटातील दोषींवरील मृत्युदंड आणि जन्मठेप रद्द केली

**अक्षरज : चंदन सिंह**

**दि.२१, मुंबई :** ७/११ स्फोट प्रकरणात विशेष मोक्का न्यायालयाने २०१५ मध्ये दिलेल्या निर्णयाला मुंबई उच्च न्यायालयाने काल मोठा झटका दिला. ११ जुलै २००६ रोजी मुंबईच्या पश्चिम उपनगरीय लोकल ट्रेनमध्ये झालेल्या साखळी बॉम्बस्फोटांप्रकरणी दोषी ठरवण्यात आलेल्या १२ आरोपींपैकी ५ जणांना दिलेला मृत्युदंड आणि ७ जणांना सुनावलेली जन्मठेप उच्च न्यायालयाने रद्द ठरवली आहे.

या स्फोटांत १८९ निष्पाप नागरिकांचा मृत्यू झाला होता, तर सुमारे ८२० नागरिक गंभीर जखमी झाले होते. विशेष मोक्का न्यायालयाने २०१५ मध्ये दोषींना शिक्षा सुनावली होती. मात्र, मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती अनिल किलोर आणि न्यायमूर्ती श्याम चंदक यांच्या विशेष खंडपीठाने नमूद केलं की, अभियोजन पक्षाने आपली केस संशयाच्या पलीकडे सिद्ध करण्यात अपयश पत्करले आहे. या प्रकरणातील दोषी आणि राज्य सरकार यांनी केलेल्या अपीलांवर सहा महिन्यांहून अधिक काळ सुनावणी झाली. शेवटी जुलै २०२४ मध्ये न्यायालयाने निकाल दिला. याप्रकरणात, काही आरोपींनी अपील प्रलंबित असल्याची खंत व्यक्त करत जलद सुनावणीची मागणी केली होती.

मोक्का न्यायालयाने कामाल अन्सारी, मोहम्मद फैसल अतर रहमान शेख, एहतेशाम सिद्दीकी, नावेद खान आणि




असीफ खान या पाच आरोपींना मृत्युदंडाची शिक्षा दिली होती. तर तनवीर अन्सारी, मोहम्मद माजिद शेख, शेख मोहम्मद अली, मोहम्मद साजिद, मुझम्मिल रहमान शेख, सुहैल शेख आणि जमीर रहमान शेख यांना जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली होती. या सर्व आरोपींनी शिक्षा मिळाल्यानंतर गेली १७ ते १८ वर्षे तुरुंगातच आयुष्य घालवले. त्यातील वहिद शेख या एकमेव आरोपीची निर्दोष मुक्तता २०१५ मध्ये झाली होती, तरी त्याने ९ वर्षे तुरुंगवास भोगला होता.

या प्रकरणात मुझम्मिल आणि जमीर या दोन आरोपींसाठी माजी ओडिशा उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश आणि सध्या वरिष्ठ वकील असलेले डॉ. एस. मुरलीधर यांनी बाजू मांडली. त्यांनी तपास यंत्रणांच्या निष्काळजीपणावर प्रश्न उपस्थित केला.या प्रकरणात चुकीच्या तपासामुळे निरपराध लोक जेलमध्ये गेले आणि वर्षानुवर्षे कैदेत राहिले. १७ वर्षांपासून हे लोक तुरुंगात आहेत. समाज, मीडिया आणि पोलिसांच्या दबावाखाली या प्रकरणात गृहित धरले गेले की आरोपी दोषीच असणार, असे मुरलीधर यांनी स्पष्ट केले. या आरोपींच्या आयुष्याचा मोठा भाग तुरुंगात गेला आहे. न्याय मिळवण्यात उशीर झाला, पण अजूनही उशीर नाही. हे न्यायालय याला योग्य दिशा देऊ शकते, असे ते म्हणाले.

एका व्यक्तीवर कलंक लागल्यावर त्याच्या कुटुंबावर, मुलांवर, नातलगांवरही त्याचा परिणाम होतो. समाज त्यांच्याकडे वेगळ्या नजरेने पाहतो. ही बाब देखील लक्षात घेणे आवश्यक आहे, असे त्यांनी कोर्टाला आवाहन केले.

**पुढील काय?**

या निकालाची सविस्तर प्रत अजून उपलब्ध झालेली नाही, परंतु या निर्णयामुळे अनेक वर्ष तुरुंगात राहिलेल्या आरोपींना नवसंजीवनी मिळाली आहे. तसेच, हे प्रकरण भारतात दहशतवादविरोधी कायद्यांतर्गत चाललेल्या खटल्यांमधील न्यायव्यवस्थेच्या दृष्टिकोनाकडे लक्ष वेधणारे ठरत आहे. ७/११ प्रकरणात न्यायालयीन निकालामुळे न्यायाची संकल्पना पुन्हा अधोरेखित झाली असली, तरी या प्रकरणात मृत्यू पावलेल्यांना व त्यांच्या कुटुंबियांना न्याय आणि उत्तरदायित्व कोण देणार? हे मोठे प्रश्न आता समाजासमोर आहेत.

## स्मार्ट मीटर विरोधात महाविकास आघाडीतर्फे महावितरण कार्यालयावर धडक मोर्चा

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.२१, विंचूर (नाशिक) :** सध्या महाराष्ट्रात स्मार्ट मीटर बदलण्याचं काम म हावितरण कडून सुरू आहे. मात्र सामान्य नागरिकांचा याला मोठ्या प्रमाणात विरोध आहे. ज्यांचे यापूर्वी मीटर बदलले त्यांना वाढीव स्वरूपाचे बिल येत असल्याने, नागरिकांमध्ये धास्तीचे वातावरण आहे.

या विरोधात महाविकास आघाडीतर्फे लासलगाव येथील महावितरण कार्यालयावर धडक मोर्चा नेवून सहाय्यक अभियंता यांना निवेदन देण्यात आले. याप्रसंगी सचिन आत्माराम होळकर, शिवा पाटील सुराशे, बाळासाहेब जगताप, सुरेश कुमावत, संतोष पानगव्हाणे, प्रमोद पाटील, संतोष वाघ, अमित बकरे,



अमित गंभीरे, आशुतोष सूर्यवंशी, राहुल वाघ, सोहम रायते, महेश शिरसाट, सतीश पवार, बाळासाहेब महाराज शिरसाट, बालेश जाधव, सिद्धू होळकर, धनंजय होळकर, अनिल भागवत, संतोष पवार, निलेश वडनेरे, विजय कुंदे तसेच या स्मार्ट मीटर बाबतच्या आणि महावितरणच्या तक्रारी असणारे असंख्य ग्राहक आणि महाविकास आघाडीच्या काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना, मनसे या पक्षांचे पदाधिकारी उपस्थित होते.

महावितरणच्या बिलांबद्दल आणि स्मार्ट मीटरच्या विरोधातील अनेक तक्रारी तक्रारदारांनी याप्रसंगी मांडल्या. महावितरण कडून सध्या बसवले जाणारे स्मार्ट मीटर हे ऐच्छिक स्वरूपाचे आहे हे सक्तीचे नाही तसेच ते सक्तीचे नसल्याने मीटर बदलण्यापूर्वी ग्राहकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक असल्याचे मत या प्रसंगी बोलताना काँग्रेस नेते सचिन होळकर यांनी व्यक्त केले.

सदरचे मीटर बसवणे हे तात्काळ थांबवणे आवश्यक आहे, अन्यथा रस्त्यावर उतरून आंदोलन करण्यात येईल. असा इशारा शिवसेना नेते शिवा सुरासे यांनी बोलताना व्यक्त केले. सदर निवेदनाद्वारे योग्य तो बदल करण्याचे आश्वासन महावितरणचे सहाय्यक अभियंता अजय सावळे यांनी आंदोलन कर्त्यांना दिले.

# विद्यार्थ्याचे यश – शिक्षकाची खरी कमाई

शिक्षक म्हणून २३ वर्षे सेवा केल्यानंतर, अनुभवाचं गाठोडं बऱ्यापैकी भरल्यानंतर मी आज ठामपणे सांगू शकतो की, विद्यार्थ्याचं यश हीच शिक्षकाची खरी कमाई असते.

शिक्षक विद्यार्थ्यांना जे शक्य आहे ते देण्याचा प्रयत्न करतो ˉ विविध कला, कौशल्यं, ज्ञान, विज्ञान, व्यवहारज्ञान, नीती, मूल्यं, सुसंस्कार, भावनिक प्रगल्भता, विचारांची ताकद, विविध खेळ, व्यायाम, लोकपरंपरा, सांस्कृतिक ठेवा, शालेय विषय... आणि बरंच काही. या साऱ्या गोष्टींमधून विद्यार्थी घडत जातो. कोणता विद्यार्थी कोणत्या क्षेत्रात चमकेल, याची पूर्वकल्पना कोणालाच नसते. एखाद्या विषयात विद्यार्थ्याला गोडी लागते, त्यामागे मुख्य कारण असतं ˉ तो विषय शिकवणारा शिक्षक आणि त्यांची शिकवण्याची अनोखी पद्धत.

शालेय शिक्षणात विद्यार्थ्यांमध्ये सर्वप्रथम जो गुण असावा, तो म्हणजे नम्रता. एखादा विद्यार्थी अभ्यासात कच्चा असला तरी चालेल, कारण तो अधिक कष्टाने हुशार होऊ शकतो. पण नम्रता नसेल, तर कोणत्याही विद्यार्थ्याचं शिक्षण व्यर्थच ठरतं! हुशार असणाऱ्या विद्यार्थ्याकडे जर नम्रता नसेल, तर त्याच्या आयुष्यात यशस्वी होण्याची खात्री देता येत नाही.नम्रता म्हणजे आदरभाव. शिक्षक, आई-वडील, मोठ्या व्यक्ती, आपली संस्कृती, परंपरा, शालेय आणि सामाजिक आचारसंहिता याबद्दलचा आदर विद्यार्थिदशेत जपलाच पाहिजे.सचिन तेंडुलकर क्रिकेटचा देव बनू शकला, कारण त्याच्या वागण्या-बोलण्यात नम्रता होती. त्याचा आपल्या गुरुंबद्दलचा आदर त्याने वेळोवेळी प्रकट केला आहे. आपल्या परंपरा, सुसंस्कार, आणि आई-वडिलांबद्दलचा आदरही त्याच्या वागणुकीतून स्पष्टपणे जाणवतो.



आज शिक्षक विद्यार्थ्यांना घडवतो ही कल्पना मागे पडत चालली असली तरी, शिक्षकांच्या खांद्यावर बसूनच विद्यार्थी आपल्या ध्येयाची उंची गाठण्याचा प्रयत्न करत असतो. आज शिक्षकाला 'सेवा पुरवणारा' (Service Provider), 'सुलभक' अशा नावांनी संबोधले जात आहे. परंतु त्याची भूमिका मात्र बदलली नाही.

शिक्षकाला सर्वाधिक आनंद कधी होतो? काहीजण म्हणतील ˉ पहिला पगार मिळाल्यावर, तर काहीजण म्हणतील ˉ नोकरी लागल्यावर... त्यांच्या म्हणण्यात तथ्य आहेच. पण यासोबतच आपल्या कष्टाचं चीज झालं, हे पाहण्याचा आनंद हा अवर्णनीय असतो. शेतकऱ्याला आपल्या शेतातील शेतमाल विकून जितका आनंद होतो, त्यापेक्षा जास्त आनंद त्याला पीक बहरल्यावर मिळतो. म्हणूनच कवयित्री बहिणाबाई चौधरी आपल्या शेतकरी भाऊरायाचं वर्णन करताना लिहितात –

शेतामधी भाऊराया  
आला पीक गोंजारत  
हात जोडीसानी केला  
धरीत्रीले दंडवत

गवंड्याला आपल्या कामाचा मोबदला मिळाल्यावर जसा आनंद होतो, त्याहीपेक्षा अधिक आनंद आपली बांधलेली इमारत पाहताना होतो.

विद्यार्थी आपण शिकवलेलं गाणं जेव्हा गातो, तेव्हा शिक्षकाला आनंद होतो. आपण कष्टाने वाचायला शिकवल्यानंतर जेव्हा विद्यार्थी खडाखड वाचू लागतो, तेव्हा शिक्षकाचं मन भरून येतं. गणिताचे उदाहरणं जेव्हा आपण शिकवल्याप्रमाणे विद्यार्थी सोडवतात, तेव्हा शिक्षकाचा आनंद गगनात मावत नाही.याच्याही पुढे जाऊन, विद्यार्थ्याचं परीक्षेतील यश, स्पर्धेतील कामगिरी, आणि त्याची उच्च पदावर नेमणूक ही शिक्षकाला मनोमन सुखावून टाकते. विद्यार्थ्याचा एखाद्या कामगिरीनंतर पेपरमध्ये झळकणारा फोटो, एखाद्या मालिका किंवा सिनेमात मिळालेली संधी ˉ हे सारे क्षण शिक्षकासाठी जीवनातील अपार आनंद देणारे असतात.

विद्यार्थ्यांच्या मेंदूची मशागत करणं हे कौशल्याचं आणि संयमाचं काम असतं. प्रत्येक विद्यार्थी वेगळा असतो. त्याची कौटुंबिक, सामाजिक, धार्मिक पार्श्वभूमी वेगळी असते. आकालनशक्ती, कल, गुणदोष यामध्ये वैविध्य असतं. हे सर्व लक्षात घेऊन शिक्षक आपलं कर्तव्य बजावत असतो.पालक जागरूक असो की निद्रस्त, त्यांना त्यांच्या पाल्याच्या शिक्षणाची आणि व्यक्तिमत्त्व विकासाची हमी शिक्षकालाच द्यावी लागते.

नवीन तंत्रज्ञान शिक्षकाची जागा घेऊ शकतं का? यावर आज चर्चा होते आहे. मात्र शिक्षण ही मानवी संवेदनांची देवाणघेवाण असते. ती एकमेकांच्या भावना समजून घेण्याची, विचारांना कृतीची जोड देण्याची प्रक्रिया असते. सर्जनशीलता, सद्वर्तन, सद्विचार यांना खतपाणी घालण्याची दीर्घ प्रक्रिया म्हणजेच शिक्षण. शाळेमध्ये कायद्याची आणि नीतीमूल्यांची ओळख करून देत, समाजव्यवस्था मजबूत करण्याचं कार्य शिक्षक करत असतो. विद्यार्थी एक नीतिमान नागरिक व्हावा, यासाठी शिक्षक सतत धडपड करत असतो.भविष्यात त्या विद्यार्थ्याने कोणताही व्यवसाय किंवा नोकरी केली तरी, तो एक सुजाण माणूस म्हणून जगला पाहिजे ˉ हेच शिक्षकाचं अंतिम ध्येय असतं.

विद्यार्थ्यांच्या यशावरूनच शिक्षक स्वतःचं स्वमूल्यमापन करत असतो.

म्हणूनच मी म्हणतो ˉ विद्यार्थ्याचं यश हीच शिक्षकाची खरी कमाई असते.

शिक्षकाच्या हृदयात विद्यार्थ्यांच्या यशाची नोंद वेगळीच असते ˉ ती ना पगाराच्या पटीत मोजली जाते, ना बढतीच्या आकड्यांत. ती मोजली जाते विद्यार्थ्याच्या प्रगतीच्या टप्प्यांमध्ये, त्यांच्या यशाच्या स्मितहास्यात, आणि त्यांच्या यशावर चमकणाऱ्या शिक्षकाच्या डोळ्यांतल्या आनंदाश्रूंमध्ये.

आजचा विद्यार्थी उद्याचा नागरिक आहे, तर शिक्षक हा त्या उद्याचा आशावादी शिल्पकार!

**- किशोर जाधव, सोलापूर**  
**मो. नं. ९९२२८८२५४१**

## संपादकीय

### महान पार्श्वगायक मुकेश !

आज २२ जुलै, हिंदी चित्रपट सृष्टीतील महान पार्श्वगायक मुकेश यांची आज जयंती. २२ जुलै १९२३ रोजी मुकेश यांचा जन्म झाला. मुकेश यांचे संपूर्ण नाव मुकेश चंद माथूर असे होते. दिल्लीतील दारियागंज आणि चांदणी चौकात त्यांचे बालपण गेले. त्यांच्या वडिलांचे नाव जोरावर चंद माथूर असे होते ते इंजिनिअर होते तर आई राणी या गृहिणी होत्या. मुकेश यांना बालपणापासून संगीताची आवड होती. त्याकाळातील प्रख्यात गायक कुंदनलाल सहगल यांचे ते प्रशंसक होते. त्यांनाही कुंदनलाल सहगल यांच्याप्रमाणे अभिनेता व गायक व्हायचे होते त्यासाठी त्यांनी लहान वयातच त्यांची संगीताचे प्राथमिक धडे गिरवले. त्याकाळातील गाजलेले अभिनेते मोतीलाल यांनी मुकेश यांना त्यांच्या दूरच्या बहिणीच्या लग्नात गाताना पाहिले. मुकेश यांचा आवाज ऐकता क्षणीच ते त्यांच्या आवाजाच्या प्रेमात पडले. एक दिवस हा आवाज हिंदी चित्रपट सृष्टिचा आवाज बनेल असे ते त्यांच्या आई वडिलांना म्हणाले. त्यांनी मुकेश यांना मुंबईत आणले आणि गायक पंडित जगन्नाथ यांच्याकडून गायनाचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण घेण्यास सांगितले. त्यांनीही गायनाचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण घेतले. या दरम्यान त्यांना काही चित्रपटात अभिनयाच्या ऑफर्स आल्या. मुकेश यांचा राजबिंडा चेहरा आणि स्मितहास्य यामुळे त्यांना थेट नायकाच्या भूमिका मिळाल्या. १९४१ साली निर्दोष या चित्रपटात त्यांनी पहिल्यांदा अभिनय केला. त्यानंतर चार पाच चित्रपटात त्यांनी भूमिका केल्या मात्र त्यांनी अभिनय केलेले चित्रपट काही विशेष चालले नाही त्यामुळे नायक बनण्याचे आपले स्वप्न बाजूला ठेवून त्यांनी गायनावर लक्ष केंद्रित केले. गायक म्हणून मुकेश यांना पहिला ब्रेक मिळाला तो १९४५ साली आलेल्या पहिली नजर या चित्रपटात. या चित्रपटात त्यांनी गायलेले दिल जलता है तो जलने दो हे गीत खूप लोकप्रिय झाले. या गीतामुळे चित्रपट सृष्टित त्यांची ओळख निर्माण झाली. या गाण्यावर कुंदनलाल सहगल यांच्या शैलीचा प्रभाव होता. १९५८ साली आलेल्या यहुदी या चित्रपटातील ये मेरा दिवानापन है हे गाणे देखील खूप गाजले या गाण्याद्वारे त्यांनी स्वतःची वेगळी शैली निर्माण केली आणि कुंदनलाल सहगल यांच्या प्रभावातून ते बाहेर पडले. त्यानंतर हिंदी चित्रपट सृष्टित मुकेश युग सुरू झाले. त्यांनी अनुनासिक शैलीत गायलेले गाणे हिट होऊ लागले. मेला आणि अंदाज या चित्रपटात त्यांनी गायलेले सर्व गाणी लोकप्रिय झाले. अंदाज हिट झाल्यानंतर मुकेश रणजित नावाच्या स्टुडिओत गायनाचा रियाज करीत होते तेंव्हा तिथे एक देखणा तरुण आला आणि म्हणाला किती भावनाप्रधान आहे तुझा आवाज. मला तुझा आवाज खूप आवडतो. तो तरुण होता राज कपूर. पुढे राज कपूर आणि मुकेश हे हिंदी चित्रपट सृष्टीतील यशाचे समीकरण बनले. या जोडीने अनेक हिट गाणी दिले. आग, आवरा, श्री ४२०, बरसात, परवरिश, अनाडी, संगम, मेरा नाम जोकर या आर के बॅनरच्या चित्रपटातील मुकेश यांनी गायलेली सर्व गाणी गाजली. राज कपूर यांचा आवाज अशीच मुकेश यांची ओळख निर्माण झाली. राज कपूर यांच्या सत्यम शिवम सुंदरम या चित्रपटातल्या गाण्याचे रेकॉर्डिंग करून ते अमेरिकेला गेले होते. डेट्रॉय मिशिगन मध्ये २७ ऑगस्ट १९७६ रोजी ते लवकर उठून अंघोळीसाठी गेले असता अचानक त्यांच्या छातीत कळ आली आणि त्यांची प्राणज्योत मावळली. त्यांच्या निधनानंत राज कपूर यांनी आज माझा आवाज कायमचा हरपला! अशी प्रतिक्रिया दिली.

मुकेश यांनी तीन दशकांहून अधिक काळ आपल्या अनोख्या गायन शैलीने रसिकांवर मोहिनी घातली. मुकेश यांचा दर्दभरा आवाज रसिकांच्या मनावर कायमचा कोरला गेला आज इतक्या वर्षानीही त्यांचा दर्दभरा आवाज रसिकांना मोहित करतो. त्यांना अनेक पुरस्कार मिळाले. रजनिगंधा या चित्रपटासाठी त्यांना राष्ट्रीय पुरस्कार मिळाला तर चार वेळा फिल्मफेअर पुरस्कार मिळाला मात्र ते रसिकांच्या मनात त्यांचे जे स्थान आहे त्याला सर्व पुरस्काराहून श्रेष्ठ आहे मानत. त्यांच्यासारखा महान पार्श्वगायक पुन्हा होणार नाही.

**जयंतीदिनी मुकेश यांना**  
**भावपूर्ण आदरांजली!**

### हिंदळु...

हिरवत्वाच्यास्वागता  
पिवळी लागती गळू  
निरोपजडत्वे देताना  
आसवे दो चार गाळू

आनंदानेफुलारलेली  
फुले सन्मानाने माळू  
काटे असे संरक्षणार्थ  
नाजूकते त्याले टाळू

सुगंध सुवास सृष्टीचा  
दिशा दिशात दरवळू  
स्नेह सारखा सर्वावर  
वनदेवता रे कनवाळू

सण साजरा इतरांचा  
गुलालआपण उधळू  
शिस्तीची इस्त्री नको  
मुक्त दिलाने खिदळू

भरती येईलं उत्साहा  
लाटा खडका आदळू  
संशयाचा स्पर्श नको  
शमेलंहळूहळू वादळू

हा माझा तो परकाचं  
कधीचं नका गोंधळू  
नाते जपणे कटूकार्य  
तोल ना मुळी हिंदळू

**-- हेमंत मुसरीफ पुणे.**  
**९७३०३०६९९६.**

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

# पावसाळी अधिवेशनातील आमदारांच्या वर्तनुकीची राज्यपालांनी नोंद घ्यावी !

### ✻ वाचकांचे मनोगत ✻

महायुती (भाजप +शिवसेना शिंदे गट + राष्ट्रवादी अजित पवार गट) पावसाळी अधिवेशनातील आमदार, मंत्री यांची वर्तनुक चिंताजनक आहे.

मंत्र्यांचे विरोधी पक्षातील आमदारांना हमरीतुमरीवर येऊन बाहेर ये तुला बघतो. एका मंत्र्यांच्या घरातील वर्तणुकीच्या प्रसिद्ध झालेल्या बातम्या. विधीमंडळ परिसरात दोन आमदारांच्या समर्थकांच्या गैरवर्तनाबद्दल महाराष्ट्र राज्यातील जनतेसमोर प्रश्न निर्माण झाला आहे. याच साठी यांना निवडून देतो काय ? जनतेच्या मनातील सल मुख्यमंत्र्यांनी बोलून दाखवली 'माजले' आहेत. म्हणून अशी कृत्य करतात. विधिमंडळातील उपहारगृह कर्मचाऱ्यांवर आमदार हात उचलतो, चुकून नव्हे तर अद्दल घडवण्यासाठी सातत्याने मारतो आहे. अशा चित्रफिती प्रसिद्ध झाल्या. पदार्थ निकृष्ट दर्जाचे होते तर कायदेशीर तक्रार कराची होती. सार्वजनिक आरोग्य विभागाने कारवाई केली असती. पण, तसे न करता आपण आमदार आहोत.

आपली दहशत लोकांना समजावी म्हणून तर कायदा हातात घेतला नाही ना ? मुख्यमंत्री महोदय माज उतरवण्यासाठी यांच्या सेवा सुविधांवर बंधन घाला. पोलीस संरक्षण काढा, दिलेली वाहने काढून घ्या, सार्वजनिक वाहनातून यांना प्रवास करू द्या. आमदार निधीचे नामकरण करा. त्यांच्या विकास कामाकरता निधी द्या. आमदार निधीतून एवजी विकास निधी म्हणून अमलबजावणी करा .त्या पैशावर, निधीवर शासनाचा अधिकार राहील असे केले तर आमदारांचा उन्माद थांबेल. लोकप्रतिनिधींकडून शासकीय अधिकारी - कर्मचारी यांना मारझोड होते म्हणून आजची हुशार तरूण पिढी शासकीय सेवेत यायला तयार होत नाही. याचाही विचार व्हावा. मुख्यमंत्री म्हणून फडणवीस अशा कृत्यांना पाठीशी घालणार नाहीत असा विश्वास जनता व्यक्त करते. राज्याचे प्रमुख राज्यपाल महोदयांनी महाराष्ट्राची संस्कृती बिघडवणार्या लोकप्रतिनिधींबाबत कठोर निर्णय घ्यावा. असे महाराष्ट्रातील जनतेचे मत आहे.

**- महादेव गोळवसकर**  
**कुर्ला मुंबई ९८६९४७६२०९**

# महायुतीतील 'प्रतापी' माणिक'रत्ने !

सत्ता मिळाली कि त्याची हवा कशी डोक्यात जाते आणि सत्तेची मस्ती, मग्रुरी, माज कसा असतो हे सर्व पक्षीय राज्यकर्त्यांच्या काळात अनेकदा अधोरेखित झाले आहे. सध्या महाराष्ट्रात फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महायुतीचे सरकार आहे. सत्ताधारी पक्षातील अनेक लोकप्रतिनिधी, त्यांचे कार्यकर्ते, त्यांचे कार्यकर्ते कशा पद्धतीने जनतेशी वागत आहेत याची अनेक उदाहरणे आहेत. अनेक मंत्र्याबाबत तर बोलायलाच नको. सत्तेचा सदुपयोगापेक्षा दुरुपयोगच अधिक होत आहे. असेच एक रत्न फडणवीस सरकार मधे आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसच्या कोट्यातून मंत्री बनलेले माणिकराव कोकाटे हे मंत्री झाल्यापासूनच वादग्रस्त ठरत आहेत. त्यांच्या नशीबाने त्यांना कृषी खात्यासारखे महत्त्वाचे खाते मिळाले, शेती क्षेत्रात बरेच काही करून दाखवण्याची त्यांना चांगली संधी मिळाली आहे, ते अनुभवी, ऊच्च शिक्षित राजकारणी हे चार वेळा आमदार झाले आहेत.

मात्र मंत्री झाल्यापासूनच माणिकराव कोकाटे हे वादग्रस्त विधाने करण्यात सातत्य राखुन आहे शेतकऱ्यांच्या प्रश्नावर ते कधीच गंभीर दिसत नाही. पिक विमा योजनेतील भ्रष्टाचाराबाबत प्रश्न विचारला तेव्हा अनावधानाने का होईना त्यांनी कुठल्याही योजनेत २-५ टक्के इतका भ्रष्टाचार मान्य करतात. तर एक रुपया भिकारी घेत नाही मात्र आम्ही एक रूपयात पीक विमा योजना देतो असे ते म्हणतात मात्र आता ती योजना देखील गुंडाळली आहे. कर्जमाफी दिली तर शेतकरी मुला मुलींचे लग्न, साखरपुडे करतात असे सांगून शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळतात.भांडवली गुंतवणूक तुम्ही करतात का सरकारच करते असे बोधामृत ते शेतकऱ्यांना पाजतात. शेती खाते ही त्यांना ऊजाड गावची पाटीलकी वाटते, शेती खात्यात करण्यासारखे काही काम नाही म्हणून ते कदाचित मोबाईल मधे गेम खेळुन आपला वेळ घालवत असावेत. खरं तर शेती शेत्रात काम करण्यासारखे खुप काही आहे.

काही दिवसांपूर्वीच राज्यातील आजी माजी मंत्री आणि वरिष्ठ नोकरशहा यांची कथित सीडी प्रकरण गाजत आहे. गेल्या आठवड्यात तर कायदेमंडळाच्या साक्षीनेच सत्ताधारी पक्षातील आमदारांच्या समर्थकांनी एका पक्षाच्या आमदारांच्या समर्थकांना पोलिसांसमोर बदडुन काढले, ही फ्रि स्टाईल हाणामारी विधिमंडळाच्या आवारातच झाली. त्या अगोदर संजय गायकवाड यांनी आमदार निवासात दबंगगिरी केली, अधुन मधुन संजय बांगर देखील आपले कौशल्य दाखवतात. तर कुणी कधीकाळी मुंबई गुजरातची राजधानी असल्याचे दावे करतो. सत्ताधारी पक्षा बरोबरच विरोधी पक्षातील अनेक वाचाळविर बेलगाम झाले आहेत, ना कोणाला कायद्याचा धाक ना शिक्षेची भिती राहिली आहे. सरकार देखील कुठल्याच बाबतीत गंभीर दिसत नाही. भाजपचे आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी तर कोणतीही कारवाई करता येणार नाही हे स्पष्ट करून टाकले आहे. तर दुसरे मंत्री रमी तर आजकाल सगळेच खेळतात असे म्हणत वेगळाच 'प्रताप' करतात. ऐकिकडे गणपती ऊत्सवात पत्ते खेळले तर जुगारी म्हणून पोलिस कारवाई करतात आणि दुसरीकडे मंत्रीच रमी चे समर्थन करतात.

भविष्यात मंत्रीमंडळ बैठकीत देखील पत्त्याचा डाव मांडला जाणार का? .ऊल्लेखनीय म्हणजे गेल्या काही महिन्यांपासून राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना (शिंदे) यांचे मंत्री आणि आमदार हेच वादग्रस्त ठरत आहेत आणि त्यांच्याच भानगडी बाहेर येत आहेत हा निव्वळ योगायोग समजावा का?

ऐकिकडे देशात सर्वाधिक शेतकरी आत्महत्या महाराष्ट्रात होत आहे शेतकऱ्यांचे जगणे मुश्किल झाले आहे मात्र कृषी मंत्री मोबाईल मधे गेम खेळण्यात मग्न आहेत. ऐकंदरीत मंत्रीपदाच्या जबाबदारीचे गांभीर्य त्यांना दिसत नाही न पेक्षा त्यांनी मंत्रीपद सोडून मोकळे व्हावे.नैतिकता, नितिमुल्ये, जनाची नाही तर मनाची तरी कोणाला कशाचेच काही पडले नाही,त्यामुळे ना कोणी नैतिक जबाबदारी घेतील ना कोणी राजीनामा देईल.

**- अनंत बोरसे**  
**शहापूर जिल्हा ठाणे**  
**९१५८४९५०३७.**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## वासुंदे सोसायटीच्या चेअरमनपदी सूर्यभान भालेकर व्हा.चेअरमनपदी लक्ष्मण झावरे यांची बिनविरोध निवड



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२१, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील वासुंदे येथील सेवा सहकारी सोसायटीच्या चेअरमनपदी सूर्यभान श्रीपदी भालेकर यांची तर व्हा. चेअरमनपदी लक्ष्मण मारुती झावरे यांची बिनविरोध निवड झाली.

या निवडीनंतर जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील यांच्या हस्ते नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. या निवडीनंतर गावात आनंद व उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून ग्रामस्थांनी एकत्र येऊन नूतन पदाधिकाऱ्यांचे स्वागत केले. यावेळी सोसायटीचे सर्व संचालक व गावातील ग्रामस्थ मोठ्या उपस्थित होते. सुजित झावरे पाटील यांनी आपल्या भाषणात सांगितले की, सोसायटीच्या प्रगतीसाठी व एकजुटीने काम करण्याचे आवाहन केले. नवनिर्वाचित चेअरमन सूर्यभान भालेकर यांनी मनोगतात सोसायटीच्या विकासासाठी सर्व संचालक मंडळाला विश्वासात घेऊन काम करण्याचा निर्धार व्यक्त केला. तर व्हा. चेअरमन लक्ष्मण झावरे यांनी ग्रामस्थांच्या विश्वासाला पात्र ठरून सोसायटीला नव्या उंचीवर नेण्याचे आश्वासन दिले.

## आ.मुनगंटीवार यांनी दिला गरजू विद्यार्थिनींना तात्काळ मदतीचा हात



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२१, चंद्रपूर :** मुल तालुक्यातील सोमनाथ प्रकल्पातील महारोगी सेवा समिती वरोरा तर्फे विना अनुदानित वसतिगृह चालवले जाते. जिथे अत्यंत गरीब आणि दुर्गम भागातील मुली शिक्षणासाठी वास्तव्यास आहेत. या मुलींना वह्या, पुस्तके, छत्री आणि टिफीन बॉक्स यासारख्या अत्यावश्यक शैक्षणिक साहित्याच्या तुटवडा जाणवत होता. या परिस्थितीची माहिती मिळाल्यानंतर समितीचे स्वयंसेवक अरुण कदम यांनी राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांना केवळ एक फोन केला. या एका फोनवर क्षणाचाही विलंब न करता आ.मुनगंटीवार यांनी विद्यार्थिनींना लागणारे साहित्य तातडीने पुरवण्याचा सकारात्मक निर्णय घेतला. विद्यार्थी शैक्षणिक साहित्यामुळे शिक्षणापासून वंचित राहू नये, या संवेदनशीलतेतून आ. सुधीर मुनगंटीवार यांनी घेतलेला हा पुढाकार आश्वासक ठरला आहे. त्यांच्या या तत्परतेनंतर अवघ्या काही तासांत शैक्षणिक साहित्य वसतिगृहात पोहोचले. महारोगी सेवा समितीचे स्वयंसेवक आणि विद्यार्थिनींनी या मदतीबद्दल आ. मुनगंटीवार यांचे आभार मानले आहे. विद्यार्थिनींच्या गरजा प्रति आपुलकी दाखवत आ. मुनगंटीवार यांनी पुन्हा एकदा संवेदनशील आणि लोकाभिमुख नेतृत्वाचा आदर्श निर्माण केला आहे. शिक्षणासाठी संघर्ष करणाऱ्या ग्रामीण भागातील मुलींसाठी त्यांचा मदतीचा हात प्रेरणादायी ठरला आहे.

## महा एनजीओ फेडरेशन, इको नेचर क्लब यांच्या माध्यमातून गोशाळेत वृक्षारोपण



**अक्षराज : साहेबराव परबत**

**दि.२२, सोलापूर :** महा एनजीओ फेडरेशन व इको नेचर क्लब यांच्या माध्यमातून महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसामुळे व शुद्ध देशी गोवंश जतन व संवर्धन दिवसानिमित आयोजित वृक्षारोपण उपक्रम गोपालक संघ गोशाळा नेहरूनगर येथे संपन्न झाला. यावेळी सोलापूर ग्रामीणचे पोलिस उपअधिक्षक विजयालक्ष्मी पुरी, महा एनजीओ फेडरेशनचे संचालक अमोल उंबरजे, क्षेत्रीय प्रचार अधिकारी अंबादास यादव, इको नेचर क्लब मुख्य प्रवर्तक व पर्यावरण दूत मनोज देवकर, गोशाळा महासंघचे महेश भंडारी आणि प्रकाश वैद्य, महेश देवकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

संचालक अमोल उंबरजे म्हणाले की, महा एनजीओ फेडरेशन आयोजित व संस्थापक शेखर मुंदडा यांच्या संकल्पनेतून महाराष्ट्रातील ५५ सामाजिक संस्थांच्या माध्यमातून संपूर्ण महाराष्ट्रात आपण जवळपास ३०० हून अधिक गोशाळेत वृक्षारोपण उपक्रम राबविण्यात येत आहे. हरित सेवा आणि गोसेवा अशा दोन्ही सेवांना जोडण्यासाठी असे उपक्रम राबवत आहोत. पर्यावरण दूत मनोज देवकर म्हणाले की, सोलापुरात खूप मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपणची गरज आहे. त्यासाठी आम्ही सर्व प्रयत्नशील आहोत. त्यामुळे असे उपक्रम राबविन्या साठी आम्ही नेहमी पुढाकार घेत असतो. गोसेवा ही महत्वाची सेवा आहे आणि त्याला जोड हरित सेवेची मिळत आहे आणि अश्या उपक्रमातून अनेक सेवांना चालना मिळते असे पोलिस उपअधीक्षक पुरी यांनी यावेळी आपल्या भाषणात म्हटले.

यावेळी पशुसंवर्धन खात्याचे डॉक्टर गिड्डे, राम हुंडारे, विजय जाधव, अभिषेक उंबरजे, उद्योजक लक्ष्मण कोळी, मदन पवार, राजेंद्र असादे, गणेश माने, महिला समन्वयक अश्विनी भोसले, उमा दिगीनाल, संजय पाल, कार्तिक चव्हाण, कपिल कोळी, राजेश वडलेश्वर उपस्थित होते. विशेष गोशाळेमध्ये देशी व औषधी वृक्ष लागवड करण्यात आली. कादंब कडुलिंब करंज आवळा अशा देशी वृक्षाची लागवड होत आहे.

## राज्यातील शेतकऱ्यांचे देशाबाहेर अभ्यास दौरे; जागतिक तंत्रज्ञानाचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याची संधी

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२१, बुलडाणा :** विविध देशांनी विकसित केलेले शेतीविषयक तंत्रज्ञान व तेथील शेतकऱ्यांनी त्याचा केलेला अवलंब व त्याद्वारे त्यांच्या उत्पन्नात झालेली वाढ जाणून शेतकऱ्यांचे ज्ञान आणि क्षमता उंचावण्याकरिता कृषी विभागाकडून अभ्यास दौरे आयोजिण्यात येत आहेत. योजनेअंतर्गत निवड झालेल्या शेतकऱ्यांना युरोप (नेदरलँड्स, जर्मनी, स्वित्झर्लंड, फ्रान्स), इस्राईल, जपान, मलेशिया, व्हिएतनाम, फिलीपाइन्स, चीन आणि दक्षिण कोरिया अशा प्रगत देशांमध्ये अभ्यास दौऱ्यावर पाठवण्यात येणार आहे. योजनेचा लाभ घेण्यासाठी अधिकाधिक शेतक-यांनी दि. २४ जुलैपूर्वी तालुका कृषी अधिकारी कार्यालयाकडे अर्ज करावेत, असे आवाहन कृषी उपसंचालक ए.बी. गावडे यांनी केले आहे.

अभ्यास दौऱ्याचे उद्दिष्टे: उत्पादन व उत्पादकता वाढविणे, शेतीमध्ये नवीन तंत्रज्ञानाचा वापर, काढणीपश्चात प्रक्रिया व व्यवस्थापन पद्धतींचा अभ्यास, जागतिक शेती व्यवस्थापन प्रणाली समजून घेणे, निर्यातक्षम शेतीचा विकास देशनिहाय अभ्यासाचे क्षेत्र: युरोप दौऱ्यामध्ये फलोत्पादन, सेंद्रिय शेती, दुग्धोत्पादनातील आधुनिक पद्धतीचा अभ्यास, इस्राईल दौऱ्यात पाणी व्यवस्थापन, कृषी यांत्रिकीकरण, जपान दौऱ्यात सेंद्रिय शेती व उच्चतंत्र शेती पद्धती, मलेशिया, व्हिएतनाम, फिलीपाइन्स दौऱ्यांत काढणीपश्चात तंत्रज्ञान आणि व्यवस्थापन, चीन दौऱ्यात कृषी एदझज, उत्पादनवाढ तंत्रज्ञान, दक्षिण कोरिया दौऱ्यात आधुनिक अन्न प्रक्रिया तंत्रज्ञानाचा अभ्यास केला जाईल. या दौऱ्यांमुळे शेतकऱ्यांमध्ये शेतातील नवोन्मेषाबाबत जागरूकता निर्माण होईल.

आधुनिक बाजार व्यवस्थापन, निर्यातीच्या संधी आणि जागतिक स्पर्धेमध्ये टिकून राहण्यासाठी शेतकऱ्यांचे ज्ञान वाढणार आहे.पात्रतेचे निकष: अर्जदार स्वतः शेतकरी असावा, अर्जदाराच्या नावावर मागील ६ महिन्यांचा ७/१२ आणि ८-अ उतारा असावा, शेती हे उत्पन्नाचे मुख्य साधन असावे, शेतकऱ्याकडे ॲग्रीस्टॅक अंतर्गत फार्मर आयडी असणे बंधनकारक आहे. फक्त एका कुटुंबातील एकाच सदस्यास या योजनेचा लाभ घेता येईल, आधार प्रमाणपत्राची प्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे, दौऱ्यास निघण्याच्या दिवशी शेतकऱ्याचे वय किमान २५ वर्षे पूर्ण असावे आणि शारीरिकदृष्ट्या तंदुरुस्त असावा. यासाठी वैद्यकीय प्रमाणपत्र अनिवार्य आहे, अर्जदाराकडे वैध पासपोर्ट असावा व त्याची मुदत किमान तीन महिने शिल्लक असावी. अर्जदार कोणत्याही शासकीय, निमशासकीय, सहकारी किंवा खाजगी संस्थेत नोकरीस नसावा, तसेच डॉक्टर, वकील, अभियंता, सीए, कंत्राटदार इत्यादी व्यवसायाशी संबंधित नसावा, यापूर्वी शासकीय खर्चावर परदेश दौरा केलेला नसावा.

**आर्थिक सहाय्य :** शासनामार्फत एकूण दौऱ्याच्या खर्चाच्या ५० टक्के रक्कम किंवा कमाल १ लाखांपर्यंत आर्थिक सहाय्य (अनुदान) दिले जाणार आहे. उर्वरित खर्च शेतकऱ्याने स्वतः भरावा लागेल.

**अर्ज प्रक्रिया :** इच्छुक शेतकऱ्यांनी प्रपत्र-१ मध्ये आवश्यक माहिती भरून, आवश्यक कागदपत्रांसह तालुका कृषी अधिकारी कार्यालयात अर्ज सादर करावा. जर पात्र अर्जांची संख्या लक्षांकापेक्षा अधिक झाली, तर जिल्हास्तरीय समितीमार्फत सोडत पद्धतीने निवड केली जाईल. निवड झालेल्या शेतकऱ्यांनी वैद्यकीय तंदुरुस्तीचे प्रमाणपत्र आणि कोरोना तपासणी अहवाल अनिवार्यपणे सादर करावे.

## स्मार्ट मीटर विरोधात महाविकास आघाडीतर्फे महावितरण कार्यालयावर धडक मोर्चा

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.२१, विंचूर (नाशिक) :** सध्या महाराष्ट्रात स्मार्ट मीटर बदलण्याचं काम महावितरण कडून सुरू आहे. मात्र सामान्य नागरिकांचा याला मोठ्या प्रमाणात विरोध आहे. ज्यांचे यापूर्वी मीटर बदलले त्यांना वाढीव स्वरूपाचे बिल येत असल्याने, नागरिकांमध्ये धास्तीचे वातावरण आहे.

या विरोधात महाविकास आघाडीतर्फे लासलगाव येथील महावितरण कार्यालयावर धडक मोर्चा नेवून सहाय्यक अभियंता यांना निवेदन देण्यात आले. याप्रसंगी सचिन आत्माराम होळकर, शिवा पाटील सुराशे, बाळासाहेब जगताप, सुरेश कुमावत, संतोष पानगव्हाणे, प्रमोद पाटील, संतोष वाघ, अमित बकरे, अमित गंभीरे, आशुतोष सूर्यवंशी, राहुल वाघ, सोहम रायते, महेश शिरसाट, सतीश पवार, बाळासाहेब महाराज शिरसाट, बालेश जाधव, सिद्धू होळकर, धनंजय होळकर, अनिल भागवत, संतोष पवार, निलेश वडनेरे, विजय कुंदे तसेच या स्मार्ट मीटर बाबतच्या आणि महावितरणच्या तक्रारी असणारे असंख्य ग्राहक आणि महाविकास आघाडीच्या काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना, मनसे या पक्षांचे पदाधिकारी उपस्थित होते.

महावितरणच्या बिलांबद्दल आणि स्मार्ट मीटरच्या विरोधातील अनेक तक्रारी तक्रारदारांनी याप्रसंगी मांडल्या.



महावितरण कडून सध्या बसवले जाणारे स्मार्ट मीटर हे ऐच्छिक स्वरूपाचे आहे हे सक्तीचे नाही तसेच ते सक्तीचे नसल्याने मीटर बदलण्यापूर्वी ग्राहकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक असल्याचे मत या प्रसंगी बोलताना काँग्रेस नेते सचिन होळकर यांनी व्यक्त केले.

सदरचे मीटर बसवणे हे तात्काळ थांबवणे आवश्यक आहे. अन्यथा रस्त्यावर उतरून आंदोलन करण्यात येईल. असा इशारा शिवसेना नेते शिवा सुरासे यांनी बोलताना व्यक्त केले. सदर निवेदनाद्वारे योग्य तो बदल करण्याचे आश्वासन महावितरणचे सहाय्यक अभियंता अजय सावळे यांनी आंदोलन कर्त्यांना दिले.

## शिक्षक, पालक, पाल्य त्रिकोण साधणे गरजेचे - डॉ.खिलारी यांचे प्रतिपादन

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२१, पारनेर (अहिल्यानगर) :** विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्ता वाढीबरोबरच पालकांचा शिक्षकासोबत योग्य समन्वय असणे गरजेचे आहे. शिक्षक पालक आणि पाल्य हा त्रिकोण साधल्यास विद्यार्थ्याचा सर्वांगीण विकास घडविण्यात फार मोठी मदत होते, असे मत अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे गव्हर्निंग कौन्सिलचे सदस्य डॉ.भाऊसाहेब खिलारी यांनी मांडले. अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे पारनेर तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथिल श्री ढोकेश्वर माध्यमिक व उच्च माध्य. विद्यालयाच्या वतीने पालक पाल्य सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी डॉ.खिलारी बोलत होते.

पुढे ते म्हणाले, आपल्या पाल्याबरोबर कोणते मित्र राहतात,तो काय करतो याची माहिती पालकांनी ठेवायला हवी. या माहितीतून आपण आपल्या पाल्याला वाईट संगतीपासून वाचवू शकतो. त्याचप्रमाणे आपल्या पाल्य कमीत कमी मोबाईलचा उपयोग करेल याकडे लक्ष दिले पाहिजे. सध्या मुले वाचन व स्वयंअध्ययन विसरले आहे. ही त्यांच्यासाठी घटक बाब आहे. कोणत्याही धड्याची प्रश्नोत्तरे लिहितांना तो धडा पूर्ण समजून वाचणे अपेक्षित आहे. वाचन व पाठांतर झाल्यावर त्याने लिखाणही करून पाहिले पाहिजे. पालकांनी वेळोवेळी विद्यालयात येऊन, आपल्या पाल्याच्या प्रगतीचा आढावा घेतला पाहिजे. शिक्षक-पालक व



विद्यार्थी यांच्यात समन्वय असेल तर, विद्यार्थ्यांची गुणात्मक वाढ होते. संस्थेमार्फत विद्यालयाला विविध सेवा सुविधा पुरविण्यात येतात. याचा लाभ विद्यार्थ्यांनी घेतला पाहिजे. शिक्षकांनी ही विद्यार्थ्यांचे हित पाहून काम करावे. असे आवाहन डॉ.भाऊसाहेब खिलारी यांनी केले. सहविचार सभेत पालकांनी आपापले मनोगत व्यक्त केले. पालकांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना प्राचार्य बाळासाहेब खिलारी यांनी उत्तरे दिली. यावेळी सावली पतसंस्थेचे चेअरमन संतोषशेठ सोनावळे, ग्राम.सदस्य अर्चनाताई रांधवण, योगेश वाळुंज, उंडे, भालके, सचिन बांडे, बंडू घोडके, अजय ठुबे, शितल शेलार, भालेकर, आंबेकर महाराज, प्राचार्य बाळासाहेब खिलारी, मल्हारी वाघस्कर, बाबासाहेब जाधव, अतुल सैद, मनिषा गाडगे तसेच शिकक्षक व पालक उपस्थित होते. सुरेखा ठाणगे यांनी सूत्रसंचालन केले. रविंद्र मते यांनी आभार मानले.

## कल्याण डोंबिवलीत सर्वत्र घाणीचे साम्राज्य

### पालिका अधिकारी मात्र मूग गिळून गप्प



**अक्षराज : संजय पंडित**

**दि.२१, कल्याण :** कल्याण डोंबिवली मनपा परिसरात गेल्या कित्येक दिवसांपासून नागरिक रस्त्यावरुन जाताना जीव मुठीत घेऊन जात आहे. कल्याण पूर्व पावशे नगर परिसरातील मुख्यरस्ता पुनालिंक रोड यासाठी गटार तुंबल्याने दुषित पाणी रस्त्यावर येत असून आजूबाजूच्या दुकांनाना आणि रस्त्याने चालणाऱ्या नागरिकांना याचा मनस्ताप होत असल्याचं दिसून येत असतानाही पालिकेचं मात्र याकडे दुर्लक्ष होत असल्याचं दिसून येत आहे. पुना लिंक रोड रस्त्याला गटार तुंबल्याने दुषित पाणी रस्त्यावर येत होते. याचा आजूबाजूच्या दुकानांना आणि रस्त्याने चालणाऱ्या नागरिकांना याचा मनस्ताप होत होता. या सगळ्या समस्येबाबत नागरिकांना पालिकेकडे तक्रार दाखल केली होती. पालिकेचे कर्मचारी येऊन तात्पुरतं गटाराचं रस्त्यावरुन वाहणारं पाणी बंद केलं. मात्र खड्डा खणलेला असल्याने रस्त्यावर गाळ तसाच पडून आहे.ऐन पावसाच्या दिवसात या सगळ्या समस्येमुळे परिसरात मोठ्या प्रमाणात रोगराई पसरुन नागरिकांचं आरोग्य धोक्यात येत आहे. इतकी गंभीर बाब असताना ही पालिकेला साधी दखल ही घ्यावी वाटत नाही यावरुन पालिकेच्या अधिकाऱ्यांचा हलर्जीपणा दिसून येत आहे.

खणलेला खड्डा, आजूबाजूला असलेला गटाराचा गाळ आणि त्यात पाणी साचून राहत असल्याने नागरिकांना रस्त्याने चालणं देखील कठीण होत आहे. अनेकदा तक्रार करुन ही पालिकेकडून कोणतीही ठोस पाऊलं उचलली जात नसल्याने नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे. काही दिवसांपूर्वी रस्त्याच्या जवळील चेंबरमध्ये पाण्याच्या बाटल्या,प्लास्टिक आणि इतर अडकून पडल्याने पाण्याला जायला मार्ग मिळत नव्हता. नागरिकांनी पालिकेच्या कर्मचाऱ्यांना साफ करुन देण्यास सांगितलं होतं. सततचा कचरा अडकून पडल्याने पाण्याचा मार्ग बंद झाला होता. त्यामुळे रस्ता खणून काम करावं लागेल असं पालिकेने सांगितलं होतं. पालिकेने यानंतर खड्डा खणून तात्पुरतं पाणी रस्त्यावर येणार नाही असा बंदोबस्त केला होता. मात्र त्यानंतर खणलेल्या खड्ड्याचं काम अर्धवट ठेवून पालिकेने पुढे काहीच काम केलं नाही. गटाराचा गाळ आणि पाया दुषित पाण्यामुळे रोगराईचं प्रमाण देखील वाढत आहे. या सगळ्याकडे पालिकेचं दुर्लक्ष असून जबाबदारी झटकण्याचा प्रयत्न होत आहे.दरम्यान समस्या फक्त पांडुरंग पावशेनगरच्या मुख्य रस्त्याचीच नाही तर हाच रस्ता पुढे विठ्ठलवाडी रेल्वेस्थानकाला जोडतो.

विठ्ठलवाडी स्मशानभूमी परिसरात कचराकुंडीतील कचरा थेट रस्तवर येतो. हीच परिस्थिती काटेमानिवली नाक्याला जाताना सारस्वत बँके समोरील कचराकुंडीची आहे. या परिसरात लहान मुलांचं हॉस्पिटल आहे. त्यात भरीला भर म्हणजे रस्ता अरुंद असून त्याच ठिकाणाहून गाड्या जातात. आधीच कचरा आणि गाड्यांचं येण जाण त्यामुळे नागरिकांना घराबाहेर पडणेच मुश्कील झाले आहे. कल्याण डोंबिवली मनपा हद्दीमध्ये स्वच्छतेचा अभाव ठिकठिकाणी दिसून येत आहे. पालिकेला नागरिकांच्या जीवाची काळजी आहे की नाही असा सवाल आता उपस्थित होत आहे.

# छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर संपन्न

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२१, पारनेर (अहिल्यानगर) :** महाराष्ट्र शासनाच्या वतीने आयोजित छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर वासुंदे येथे मोठ्या उत्साहात पार पडले. टाकळी ढोकेश्वर महसूल मंडळातील वडगाव सावताळ, गाजदीपूर, पोखरी, खडकवाडी, देसवडे, पळशी यांसह परिसरातील अनेक गावांतील मागासवर्गीय, आदिवासी व इतर हजारो नागरिकांनी या शिबिराचा प्रत्यक्ष लाभ घेतला.

ग्रामीण भागात सरकारी योजना थेट नागरिकांच्या दारी पोहचल्याने नागरिकांना याचा फायदा होईल व शासकीय कामे झटपट होतील असे सुजित झावरे पाटील यावेळी म्हणाले.

शिबिराचे आयोजन हे केवळ सुविधा उपलब्ध करून देणे नसून शासनाने ग्रामीण भागातील जनतेस दिलेली एक अमूल्य भेट आहे.

या शिबिरात नागरिकांनी मिळालेला प्रतिसाद पाहता, अशा उपक्रमांची वारंवार गरज भासते. ग्रामीण भागातील अनेक नागरिकांना आवश्यक दाखले मिळविण्यासाठी पारनेर येथे वारंवार जावे लागते. त्यात वेळ, पैसे आणि त्रासही सहन करावा लागतो.

नागरिकांनी यासंदर्भात शिबिर आयोजनाची मागणी केली होती. प्रांताधिकाऱ्यांची भेट घेऊन ही गरज मांडली असता त्यांनी तातडीने शिबिर आयोजित करण्याचे आदेश दिले. या उपक्रमात विविध शासकीय विभागांचे अधिकारी, कर्मचारी यांनी एकत्र येऊन नागरिकांना सेवा पुरवल्या. शिबिराच्या ठिकाणी दस्तऐवज पडताळणी, अर्ज प्रक्रिया, त्वरित प्रमाणपत्र वितरण यासाठी स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली होती.



**सामाजिक दृष्टीकोनातून अत्यंत महत्वाची पायरी**

ग्रामीण व मागास भागातल्या नागरिकांपर्यंत शासनाच्या योजनांचा थेट लाभ पोहोचवण्यासाठी हे शिबिर अत्यंत उपयुक्त ठरले. विशेषतः महिला, विद्यार्थी, शेतकरी, वंचित व आदिवासी घटकांकरिता या शिबिराने दिलासा दिला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाने आयोजित हे समाधान शिबिर म्हणजे जनतेच्या सेवेसाठी शासनाची जबाबदारी आणि आमची बांधिलकी दर्शवणारा उपक्रम आहे, असेही सुजित झावरे पाटील यांनी सांगितले.

# श्री संताजी शैक्षणिक व सामाजिक विकास संस्थेतर्फे वृक्षारोपण

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२०, सातारा :** श्री संताजी शैक्षणिक व सामाजिक विकास संस्था सातारा महाराष्ट्राच्या वतीने दिनांक २० जुलै २०२५ रोजी कुडाळ शेजारी म्हसवेची सोंड या ठिकाणी वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित केलेला होता.




या कार्यक्रमासाठी जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यातून वृक्षप्रेमी हजर होते. यावेळी पिंपळ, जांभूळ, आवळा, वड, लिंब व इतर अनेक प्रकारच्या रोपांची लागवड या ठिकाणी केली. रोप लागवडीची पूर्वतयारी कुडाळ तेली बांधवांनी अत्यंत सुंदरपणे केलेली होती. वृक्षांचे रोपांची लागवड केल्यानंतर त्यांना लगेच पाणी मिळावे. यासाठी टँकरने पाणी पुरवठ्याची सोयी या ठिकाणी केलेली होती. याशिवाय जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यातून हे वृक्ष प्रेमी या ठिकाणी येणार ,त्यांना निश्चितच वेळ होणार. यासाठी त्यांचे भोजनाची सोय कुडाळ तेली समाजाने अत्यंत उत्कृष्ट पद्धतीने केलेली होती.

या कार्यक्रमासाठी सर्वश्री बबन किरवे, राजेंद्र किरवे, अनिल किरवे, दौलत किरवे, अरुण किरवे, विलास किरवे, रामचंद्र दळवी, किरण किरवे, चंद्रकांत गवळी, विजय चव्हाण, शंकराव शिनगारे, महादेव शिंगारे, शिवाजी लोखंडे, पप्पू किरवे, भिकाजी किरवे, चंद्रकांत किरवे, प्रवीण रोकडे, अरुण रोकडे, अरुण किरवे, राजेंद्र हाडके, कृष्णा चिंचकर, राजेंद्र तांबे, अनिल शिरसागर, शंकरराव भोज, गणपत पडगळ, नंदकुमार जयराम किरवे, ओंकार किरवे, राजेंद्र रामचंद्र किरवे, विक्रम शिवाजी किरवे, अनिल किरवे, सतीश दळवी, शिवदास किरवे, पोपट भोज, विठ्ठलराव शिरसागर, प्रदीप देशमाने, शिवाजीराव गंधाले, मारुती शिरसागर व अध्यक्ष राम पडगे याशिवाय अनेक मान्यवर उपस्थित होते.

महिलांच्या उपस्थितीमध्ये अश्विनी किरवे, अश्विनी विलास किरवे, रत्ना दळवी, माया गवळी, आशा किरवे, सुरेखा किरवे, कमल शिनगारे, मेघा शिंगारे, सुनिता चव्हाण, लता किरवे, विद्या किरवे, संध्या किरवे, वैशाली किरवे, राजश्री रोकडे याशिवाय अशा अनेक महिला भगिनी या ठिकाणी उपस्थित होत्या.

यावेळी वृक्षमित्र सतीश दळवी यांनी आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले की, प्रत्येकाने आयुष्यामध्ये ५ तरी झाडे लावावीत. त्याचे संगोपन करावे. वृक्ष आपले मित्र आहेत. आपण सर्वांनी या मोहिमेमध्ये सहभाग घेतला यासाठी त्यांनी उपस्थित सर्वांचे आभार मानले.

यावेळी पोपटराव भोज यांनी जाहीर केले की, पुढच्या वर्षी पिंपोडेच्या शाळेच्या प्रांगणामध्ये मी झाडांसाठी जागा देतो व त्या सुरक्षित ठिकाणी झाडे लावण्याचा कार्यक्रम घेण्यात यावा.

यावेळी जावली तालुक्याच्या संघटना अध्यक्ष अश्विनी किरवे म्हणाल्या, मी आपणा सर्वांचे जिल्ह्यातून आलेल्या वृक्षप्रेमी लोकांचे स्वागत करते व संघटनेच्या माध्यमातून जे असे कार्यक्रम होत आहेत ते निश्चितच योग्य आहेत व आम्ही सर्व महिला यामध्ये मोठ्या संख्येने सहभागी होणार आहोत.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने संस्थेचे अध्यक्ष राम पडगे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की, आजचा वृक्षारोपण कार्यक्रम राष्ट्रहिताचा व आपल्या भवितव्यासाठी आवश्यक आहे. आपण सर्वजण या ठिकाणी सहभागी झालेला आहात. यासाठी आपले मनःपूर्वक धन्यवाद. संघटनेमार्फत अनेक असे कार्यक्रम राबवले जातात ते आपणापर्यंत पोहोचावेत यासाठी गावोगावी संघटनेचे सदस्य असणे गरजेचे आहे.

संघटनेमार्फत सातारा जिल्हा कौटुंबिक माहिती एकत्रित करण्याची फार मोठी मोहीम आखलेली आहे. याला समाज बांधवाकडून अत्यंत चांगला प्रतिसाद मिळत आहे. तथापि ग्रामीण भागामध्ये याची अद्याप माहिती नाही तरी आपण सर्वांनी याची माहिती ग्रामीण भागापर्यंत पोहोचवावी.

यानंतर सर्व महिलांनी वृक्ष पूजन करून वृक्ष लागवडीचा कार्यक्रम सुरू केला. झाडे लावल्यानंतर त्याला पाणी मिळावे यासाठी टँकरची ही व्यवस्था करणेत आलेली होती. कुडाळतील समाजाने अत्यंत उत्कृष्ट नियोजन करून हा कार्यक्रम यशस्वी केलेला आहे. यासाठी संघटनेमार्फत सर्व कुडाळतील समाजाचे त्याशिवाय संघटनेचे सर्व पदाधिकारी यांचे धन्यवाद व्यक्त करण्यात आले. भविष्यामध्ये असे कार्यक्रम वेळोवेळी संघटनेमार्फत घेऊन समाजाचे सेवा करण्याचा मनोदय अध्यक्ष राम पडगे यांनी व्यक्त केला. दुपारी अडीच ते तीन च्या दरम्यान सर्वांनी एकत्र बसून म्हावशीचे डोंगरावरती एकत्रित सहभोजन केले. अत्यंत चांगली व्यवस्था या ठिकाणी करण्यात आली होती. या सहभोजनाचा सर्वांनी मनसोक्त आनंद घेतला व या वृक्षारोपण कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# धारीवाल कंपनीची फेरचौकशी करण्याचा निर्देश

## आ.अडबाले यांच्या प्रश्नावर जलसंपदा मंत्र्यांचे आश्वासन

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२१, चंद्रपूर :** जिल्ह्यातील ताडाळी एमआयडीसी येथील धारिवाल इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीने वर्धा नदी ते विद्युत निर्मिती प्रकल्पासाठी मंजूर मार्ग न वापरता खाजगी जमिनीतून पाईपलाईन आहे. या पाईपलाईनच्या गळतीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे असा त्यांच्यावर आरोप आ. सुधाकर अडबाले यांनी लावला. त्या कंपनीची फेर चौकशी करण्याचे निर्देश जलसंपदामंत्री गिरीष महाजन यांनी दिले आहे. आ.अडबाले यांनी पावसाळी अधिवेशनात या विषयावर तारांकित प्रश्न उपस्थित करत कंपनीने चुकीचा मार्ग वापरल्याने शेतकऱ्यांचे



नुकसान झाले. अद्याप दंडात्मक कारवाई का करण्यात आली नाही, असा सवाल केला. तसेच नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना योग्य ती भरपाई देण्यात यावी, अशी मागणी ही त्यांनी सभागृहात मांडली.

या प्रश्नावर उत्तर देताना जलसंपदामंत्री गिरीश महाजन म्हणाले की, धारिवाल कंपनीने शासकीय मंजुरी नुसार ६ फुट खोलीत पाईपलाईन टाकणे आवश्यक होते. मात्र, त्यांनी ही पाईपलाईन खाजगी जमिनीतून आणि कमी खोलीत टाकल्याने गळती होत असून त्यातून शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे.

या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी १८ मार्च रोजी आदेश पारीत करुन उपअधीक्षक, तहसीलदार, तालुका कृषी अधिकारी व अन्य अधिकारी अशा अधिकाऱ्यांची समिती नेमली होती. मात्र, या समितीने केवळ सहा शेतकऱ्यांना १५ हजार रुपयांची भरपाई दिल्याचा अहवाल दिला आहे. मंत्री महाजन यांनी या अहवालावर नाराजी व्यक्त करीत, चौकशी प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. १५ हजार रुपयाची मदत म्हणजे केवळ प्रवास खर्चापेक्षा कमी आहे. वास्तविक नुकसान किती झाले याचा वस्तुनिष्ठ अहवाल मिळणे आवश्यक आहे. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांना नव्याने चौकशी करण्याचे निर्देश देण्यात येत आहेत. कंपनीने मंजूर मार्गानेच पाईपलाईन टाकावी व तोपर्यंत गळती होणार नाही याची काळजी कंपनीने घ्यावी, असे स्पष्ट निर्देश जलसंपदामंत्री गिरीष महाजन यांनी सभागृहात दिले. धारिवाल कंपनीकडून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळेपर्यंत सभागृहात पाठपुरावा करणार असल्याचे यावेळी आ. सुधाकर अडबाले यांनी सांगितले.

# शिष्यवृत्ती, नवोदय व सैनिक स्कूल परीक्षेत बोरी शाळेची गगनभरारी

**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.२१, खंडाळा (सातारा) :** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बोरी शाळेतील ई.५ वी वर्गातील ७ विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक झाले असून तालुक्यातील सर्वाधिक शिष्यवृत्तीधारक असणारी व १०० टक्के निकाल असणारी शाळा म्हणून बोरी शाळेला बहुमान मिळाला. शाळेतील एकूण १७ विद्यार्थी या परीक्षेस बसले होते.



त्यापैकी २३० पेक्षा जास्त गुण मिळवणारे ११ विद्यार्थी आहेत. यामध्ये रुद्र जयदीप वेळे, कु.ईश्वरी सचिन धायगुडे, असद सलिम शेख, कु.श्रेया विजय धायगुडे, रुद्राक्ष रविंद्र धायगुडे, अभिनव बापूराव धायगुडे व दर्शन मनोज धायगुडे हे ७ विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक झाले आहेत. जवाहर नवोदय विद्यालय सातारा येथे इयत्ता ६ वी साठी कु.ईश्वरी सचिन धायगुडे हिची निवड झाली आहे. तसेच सैनिक स्कूल प्रवेश परीक्षेत ५ विद्यार्थी २५० पेक्षा जास्त गुण मिळवून पात्र झाले आहेत.

# थोडक्यात

## टाकळी ढोकेश्वर येथे अरविंद ठाणगे यांचा सत्कार

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२१, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथे तिखोल येथील प्रगतिशील शेतकरी सुदाम ठाणगे यांचे चिरंजीव अरविंद सुदाम ठाणगे यांनी (इ.अ., डङइ) पदवी प्राप्त केल्याबद्दल सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला. अरविंद हे तिखोल सेवा सोसायटीचे माजी चेअरमन शिवाजी ठाणगे यांचे नातू आहेत. सामाजिक कार्यकर्ते मोहनराव रोकडे मित्र परिवाराच्या वतीने हा सत्कार करण्यात आला. यावेळी मोहनराव रोकडे यांनी अरविंद यांना शुभेच्छा देताना सांगितले की, त्यांनी सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांची सोडवणूक करणारा आणि कायद्याची माहिती देणारा वकील म्हणून पारनेर तालुक्यात स्वतःची ओळख निर्माण करावी.



या समारंभास चेअरमन शिवाजीराव ठाणगे, उद्योजक अशोक खराबी, सेवानिवृत्त कृषी अधिकारी सोन्याबापू बर्वे, सेवानिवृत्त मुख्याध्यापक अशोक रोकडे, उद्योजक संदीप रांधवन, सामाजिक कार्यकर्ते अर्जुन शिर्के आदी मान्यवर उपस्थित होते. अरविंद यांच्या यशाबद्दल सर्वांनी कौतुक केले आणि त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभकामना दिल्या. हा कार्यक्रम स्थानिक समाजात प्रेरणादायी ठरला असून अरविंद यांनी भविष्यात सामाजिक कार्यात मोलाचे योगदान द्यावे, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

## चंद्रभागा वाळवंट परिसरात शहर पोलीस, आर्ट ऑफ लिव्हिंगची स्वच्छता मोहीम

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.२१, पंढरपूर :** आषाढी यात्रा मुख्य सोहळा ०६ जुलै २०२५ रोजी संपन्न झाला. यात्रा कालावधीत श्री विठ्ठल-रुक्मिणी दर्शनासाठी पंढरपूर शहरात लाखोंच्या संख्येने भाविक आले होते. यात्रा कालावधीत चंद्रभागा वाळवंट परिसरातही भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होती. येणाऱ्या भाविकांसाठी चंद्रभागा वाळवंट परिसर स्वच्छ असावा. यासाठी पंढरपूर शहर पोलीस अधिकारी - कर्मचारी व आर्ट ऑफ लिव्हिंगचे महिला व पुरुष साधक तसेच नगरपालिका अधिकारी कर्मचारी यांच्याकडून चंद्रभागा वाळवंट परिसरात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.



यात्रा कालावधीत वाळवंट परिसरात भाविकांची गर्दी मोठ्या प्रमाणात होत असल्याने सदर परिसरात सामाजिक बांधिलकी निर्माण व्हावी. याकरिता जिल्हा पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधिक्षक प्रितम यावलकर यांच्या सुचनेनुसार उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ.अर्जुन भोसले तसेच पंढरपुर शहर पोलीस ठाणेचे अधिकारी व अंमलदार यांनी दिनांक २० जुलै २०२५ रोजी वाळवंट परिसरात आर्ट ऑफ लिव्हींग धाराशिव संस्थेचे नंदु भैय्या तांबडे तसेच पुरुष व महिला साधक त्याचबरोबर पंढरपुर नगरपालिकाचे अधिकारी व कर्मचारी यांनी एकत्रित येवुन वाळवंट परिसरातील मोठया प्रमाणात कचरा गोळा करून स्वच्छता मोहिम राबविली.

## दत्त मंदिर गादी सोहळा; दत्त नामाच्या गजरात महाप्रसाद वाटप

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.२१, मुदखेड (नांदेड) :** मुदखेड तालुक्यातील सरेगाव येथील दत्त मंदिर संस्थांच्या मठाचे मठाधिपती म्हणून संत महंत सच्चिदानंदबन गुरु यदुबन महंत महाराज यांचा अधिष्ठान गादी सोहळा दत्त नामाच्या गजरात, भक्तिमय वातावरणात पार पडला आहे. दत्त भक्तांच्या वतीने महाप्रसादाचे वाटप करण्यात आले आहे. श्री १०८ महंत स्वामी शांतीब्रह्म यधुबन गुरु गंभीरबन मंथ महाराज कोलंबी यांच्या कृपा आशीर्वादाने श्री पंचदशना जुना आखाडा वाराणसी (काशी) यांनी मठाधीपती संन्यासी महंत म्हणून प्रमाणपत्र बहाल करण्यात आले आहे. यानिमित्त दिनांक २० जुलै २०२५ रोजी गादी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यानिमित्ताने अभिष्टचिंतन सोहळा, दत्त भक्तांच्या वतीने सामूहिक सत्कार सोहळा व कीर्तन महोत्सव महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कीर्तनकार संत शहापुरी गुरुमंत रमणपुरी महाराज दत्त मठ निरंजन माहूर झटाळा यांनी आपल्या मधुर संतवाणीतून दत्तभक्तांना सुखी आयुष्य जगण्याचा उपदेश केला.



ग्रामस्थांच्या वतीने मठाधिपती गादी सोहळा निमित्त सव्वाखंडी महापूजेचे आयोजन करण्यात आले होते. दत्त भक्तांच्या वतीने मंदिराची फुलाने तसेच रोषणाईने सजावट करण्यात आली होती. दत्त नावाच्या गजरात मंदिर परिसर दुमदुमला होता. भक्तिमय वातावरणात संत सच्चिदानंदनबन गुरु यदुबन महंत महाराज यांचे ग्रामस्थांच्या वतीने अभिष्टचिंतन करून औक्षण करण्यात आले. यानंतर थाटामाटात गाडी सोहळा पार पडला. यानंतर दत्तभक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. या कार्यक्रमास श्रीकृष्ण ज्ञान मंदिर मठाचे महंत गोपीराज बाबा जामोदेकर तसेच अनेक संत, महंत, दत्तभक्त ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पनवेल मनपा मार्फत कळंबोली रोडपाली येथे वृक्षारोपण

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२१, पनवेल :** महानगरपालिका उद्यान विभाग आणि रोडपाली रेसिडेन्सी वेल्फेअर असोसिएशन, रोडपाली यांच्या संयुक्त विद्यमाने रोडपाली येथील सेक्टर २०, मैदानाच्या सभोवताली वृक्षारोपण करण्यात आले. पर्यावरणाच्या संवर्धनासाठी आयुक्त मंगेश चितळे, अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे आणि उपायुक्त डॉ.वैभव विधाते यांच्या मार्गदर्शनाखाली वृक्षारोपणाचा आणि नागरिकांना मोफत वृक्ष वाटपाचा कार्यक्रम पनवेल महानगरपालिका उद्यान विभागामार्फत सुरू आहे.

या कार्यक्रमा अंतर्गत रोडपाली, कळंबोली, मैदानाच्या सभोवताली, जांभूळ वृक्षांच्या ५० रोपांचे वृक्षारोपण करण्यात आले. सहा.आयुक्त डॉ.रूपाली माने व उद्यान विभागप्रमुख अनिल कोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली उद्यान पर्यवेक्षक विशाल हुडेकर, सहाय्यक उद्यान पर्यवेक्षक सुमित बोडके आणि महेश घोडसरे यांचे या वृक्षारोपण कार्यक्रमासाठी सहकार्य लाभले.